"Education through self-help is our motto"- KARMAVEER

Estd. : 1954

Office : (02164)271346
Resi : (02164)271794

Rayat Shikshan Sanstha's

# Sadguru Gadage Maharaj College, Vidyanagar, Karad.

Pin-415 124. Dist.Satara (M.S.) INDIA. P.O.Box.No.3
ARTS, SCIENCE & COMMERCE (Junior and Senior)
(Affiliated to Shivaji University, Kolhapur)
Founder : Karmaveer Bhaurao Patil, D.Litt.

~~Prin. Arun Barge~~ प्राचार्य, व्ही. एस. लिपारे
एम.ए.

Ref.No. :
Date : 13-4-05

## शिफारस पत्र

कु. माने माधुरी संभाजीराव ह्या या महाविद्यालयाच्या सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात एम.फिल. (मराठी) पदवी अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थिनी होत्या. त्यांनी "वा.ल.कुलकर्णी यांच्या साहित्य समीक्षेचे विशेष" या विषयावर डॉ. कन्हैया कुंदप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका पूर्ण केली आहे. त्यांची प्रबंधिका एम.फिल. परीक्षेसाठी स्वीकारावी अशी मी शिफारस करतो.

प्राचार्य,
सदगुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड.

SADGURU GADAGE MAHARAJ COLLEGE KARAD

**प्रा. डॉ. कन्हैया बाबुराव कुंदप**
कलासागर (बंगला), विद्यानगर,
एस. जी. एम. कॉलेजसमोर, कराड.

# ❊ प्रमाणपत्र ❊

कुमारी माने माधुरी संभाजीराव यांनी वा. ल. कुलकर्णी यांच्या साहित्य समीक्षेचे विशेष या विषयावर माझ्या मार्गदर्शनाने ही प्रबंधिका त्यांनी स्वत: पूर्ण केलेली आहे. हा प्रकल्प विद्यापीठाच्या एम्. फिल. पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांचे शोध प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व शोध प्रबंधिका सादर करण्यास काहीही अडथळा नाही. याची मला खात्री वाटते.

मार्गदर्शक

कराड.

दिनांक : २४-७-२००४

प्रा. डॉ. कन्हैया बाबुराव कुंदप
एम्. ए. पीएच्. डी.

# ✽ प्रतिज्ञापत्र ✽

## " वा. ल. कुलकर्णी यांच्या साहित्य समीक्षेचे विशेष "

या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. (मराठी) या पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा त्यातील कोणताही भाग अन्यत्र कोठेही व कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही. तसेच माझे संशोधन कामही स्वतंत्र निर्मिती असून माझ्या माहितीप्रमाणे शिवाजी विद्यापीठात किंवा अन्य कोणत्याही विद्यापीठात या विषयावर प्रबंधिका सादर झालेली नाही.

अभ्यासक

**कु. माधुरी संभाजीराव माने**

सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड.

ता. कराड, जि. सातारा.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|
| भूमिका | मनोगत | ०१ |
| प्रस्ताविक | प्रास्ताविक, प्रबंधिकेची अभ्यास पद्धती | ०३ |
| प्रकरण पहिले | मराठी समीक्षेची पूर्व पिठीका<br>समीक्षेच्या निर्मितीची कारणे (१ ) प्राचीन कालखंडातील समीक्षक व त्यांच्या समीक्षेचे स्वरुप (२ते७) संत व पंडित काव्यावर केलेली समीक्षकांची मते(२ते९) अर्वाचीन समीक्षेचा कालखंड(९ते२५) अर्वाचीन समीक्षकांच्या समीक्षेचे स्वरुप(१ ते २०) | |
| प्रकरण दुसरे | वा. ल. कुलकर्णी यांचे समीक्षा लेखन<br>वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षणात्मक लेखना उद्देश ( २९ ) समीक्षा लेखन केलेले वाड;मयीन प्रकार (२९) कथा ( ३४ ), कादंबरी (३०ते३४), नाटक (३८ते४५) चरित्र(४५), आत्मचरित्र(४६), लेखकाची लेखन शैली (५०), काव्य(५३), लघुनिबंध(४६ते४८) वाड;मयातून केलेला लेखकाच्या व्यक्तिमत्वाच अभ्यास(४८) वा.लं.च्या समीक्षेबद्दल साहित्यीकांची मते(४४) वाचकांच्या मनामध्ये समीक्षेची गोडी निर्माण व्हावी यासाठी सांगितलेले उपाय (५२ते५५) हैदराबाद येथे भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या भाषणात मांडलेले समीक्षेविषयीचे विचार(५७) नाटक व नाटककार यांच्याविषयी केलेली समीक्षा (५५ते६१) मराठी वाड;मयात वा. लं.च्या समीक्षेचे योगदान (६२) | |
| प्रकरण तिसरे | वाड;मयाची प्रकृती, वाड;मयाचे प्रयोजन आणि वाड;मयाची भाषा या विषयीची वा. लं.ची भूमिका<br>वाड;मयाच्या प्रकृती विषयीची भूमिका मांडताना दिलेली उदाहरणे (६४ते७३) वाड;मयाच्या भाषेविषयी भूमिका मांडताना दिलेली उदाहरणे(७३ते८०) वाड;मयाच्या प्रयोजनाविषयी भूमिका मांडताना दिलेली उदाहरणे (८०ते८६) | |
| प्रकरण चौथे | वाड;मय समीक्षेविषयी वा. ल. कुलकर्णी यांची भूमिका.<br>नाटक या वाड;मय प्रकाराच्या समीक्षेची पद्धत कशी असली पाहिजे या बद्दल वा. लं. ची समीक्षणात्मक विचारातून मांडलेली भूमिका (८९), समीक्षेची स्वरुप ( ८९, समीक्षेच्या | |

| अ. क्र. | तपशील | पृष्ठांक |
|---|---|---|
| | शोधाची दिशा (९१), कादंबरीच्या परीक्षांकाराला दाखविलेली समीक्षेची दिशा (९१), हैद्राबाद येथे साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून मांडलेली समीक्षेची भूमिका (८९), ललित वाङ;मय कृती व समीक्षा यांचा परस्पर संबंध उलघडून दाखविलेले आहे (१००), १०४ | |
| प्रकरण पाचवे | वाङ;मयीन टीकाकार : सर्वज्ञ की रसज्ञ ?<br>वाङ;मय कृतीच्या अंतर्गत संघटनेचे स्वरुप(१०९ते), वाङ;मयीन टीकेचे स्वरुप(११०), वाङ;मयीन टीकेतील समस्या(१०९), टीकाकाराच्या मर्यादा(१११), वाङ;मय कृतीचे स्वरुप(११०), वाङ;मयीन टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ हे पटवून देण्यासाठी दिलेली उदाहरणे(१११), सामान्य वाचक व टीकाकार यांचे परस्पर संबंध(११२), वाङ;मयीन टीकाकाराने घ्यावयाच्या दक्षता( ), | |
| प्रकरण सहावे | वा. ल. कुलकर्णी यांच्या टीकालेखनाचे विशेष<br>समीक्षेच्या भाषेचे विशेष (१२०), समीक्षा लेखनाच्या मांडणीचे विशेष (१२०), समीक्षा लेखनाचे विशेष (१२२), १३० | |
| परिशिष्ट १ | वा. ल. कुलकर्णी यांचे समग्र साहित्य. | |
| परिशिष्ट २ | वा. ल. कुलकर्णी यांचे मान सन्मान | |
| परिशिष्ट ३ | वा. ल. कुलकर्णी यांचे टीकात्मक लेख. | |
| परिशिष्ट ४ | वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेतून जाणवणारी व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये | |
| परिशिष्ट ५ | एक वाङ;मय समीक्षक म्हणून वा. ल. कुलकर्णी यांचे वाङ;मयीन क्षेत्रात असलेले स्थान. | |
| | संदर्भ ग्रंथ सूची | |

# मनोगत

वा. ल. कुलकर्णी यांच्या साहित्य समीक्षेचे विशेष. हा विषय एम्. फिलच्या शोध प्रबंधिकेसाठी निवडण्यामागे मराठी विभाग प्रमुख डॉ. रविंद्र ठाकूर (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) तसेच मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन विषय निश्चित केला.

बी. ए. च्या अभ्यासक्रमात समीक्षा व समीक्षकांचा अभ्यासक्रम थोड्याच प्रमाणात अभ्यासायला मिळाला. एम. ए. च्या अभ्यासक्रमात साहित्य विचार व समीक्षा हा पेपर होता. तेव्हा पासूनच समीक्षेविषयी मनामध्ये आवड निर्माण झाली. समीक्षेचा अभ्यास मी सखोलपणे व आवडीने केलेला होता. समीक्षा हा विषय तेव्हा पासून मला सोपा वाटू लागला. त्यावेळी मनामध्ये विचार सतत घोळत होता की, समीक्षेवर संशोधन करावे हे माझ्यासाठी एक आव्हान होते. ते स्विकारुन पूर्ण करावे ही माझी महत्वाकांक्षा होती. त्यासाठी कितीही परीश्रम घ्यावे लागले तरी घेण्याची माझी जिद्द होती. पुढे एम्. फिलच्या शोध प्रबंधिकेसाठी समीक्षेवर आधारी असा वा. ल. कुलकर्णी यांच्या साहित्य समीक्षेचे विशेष हा विषय घेवून तो मी माझे गुरु आदरणीय डॉ. कन्हैया कुंदप त्यांच्यासमोर मांडला. तेव्हा सरांनीही मार्गदर्शन करण्याचे कबुल केले. मला अतिशय आनंद झाला. आणि मी त्वरीत याविषयावर प्रबंधिका लिहिण्यासाठी तयारी दर्शवून हो म्हणाले. एम्. फिलमुळे समीक्षेचा अभ्यास करण्याची संधी मला मिळाली.

वा. ल. कुलकर्णी हे २० व्या शतकातील अतिशय नावाजलेले समीक्षक म्हणून वाड;मयीन क्षेत्रात त्यांची ओळख आहे. अतिशय नामांकित समीक्षकाचा अभ्यास करताना उत्सुकता वाटत होती. वा. लंच्या पूर्वीच्या समीक्षकांचा आणि समकालीन समीक्षकांचा अभ्यास करायला मिळाला. प्राचीन ते अर्वाचीन कालखंडातील समीक्षेचा धावता आढावा घेता आला. त्या सर्व समीक्षकांमध्ये वा. लं.चे निराळेपण शोधता आले. वा. लं.च्या सर्व समीक्षेचा अभ्यास केल्यानंतर मला स्वत:ला एक अभ्यासक या नात्याने त्यांच्या बद्दल असे विधान करावेसे वाटते की, वा. लं.नी वाड;मयीन समीक्षेच्या क्षेत्रात फार मोठा विकास घडवला. एक वाड;मय अभ्यासक एक समीक्षक या नात्याने त्यांनी आपले कार्य अत्यंत सचोटीने केले.

वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षा लेखनाबरोबरच त्यांची समीक्षेविषयी भूमिकाही या प्रबंधिकेमध्ये समाविष्ट केली आहे. प्रयोजन भाषा प्रकृती या विषयी त्यांची भूमिका समजावून घेता आली. त्यांची समीक्षेवरही विचार मांडले. टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ ? या प्रश्नावरही सखोल अभ्यास करता आला. वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेचा अभ्यास केल्यानंतर अनेक विशेष जाणवले. हा सर्व अभ्यास करताना मला योग्य दिशा दाखविण्याचे काम माझे आदरणीय गुरु डॉ. कन्हैया कुंदप यांनी केले. प्रबंधिका पूर्ण करत असताना मला वेळोवेळी ज्या शंका

निर्माण झाल्या त्या शंकांचे निरसण माझ्या गुरुंनी वेळोवेळी केले. माझ्या आदरणीय गुरुंच्या आशिर्वादाची प्रेरणेमुळे मला धैर्य मिळाले. म्हणूनच मी ही प्रबंधिका पूर्ण करु शकले. गुरुविना शिष्य हा अपूर्ण असतो. याची जाणीव झाली. चांगला गुरु मिळण्यासाठी शिष्याचे सुदैव लागते. त्याबाबतीत मी स्वत:ला मी सुदैवी मानते.

एम्. अभ्यासक्रमाला प्रवेश घेवून तो पूर्ण करण्यासाठी सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज कराड येथील अनेकांचे सहकार्य लाभले. तसेच प्राध्यापक सौ. सरलादेवी ई. निकम, डॉ. श्रीमती सुमन पाटील, प्रा. सौ. सुर्यमाला जाधव, प्रा. सौ. एस. डी. रैनाक; स. गा. म. कॉलेज कराडचे मराठी विभागाचे सर्व शिक्षक यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्याबद्दल मी त्यांची सदैव ऋणी आहे.

तसेच मला एम्. फिल.अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी माझी मानसिक तयारी करणारे व प्रेरणा देणारे माझे माता-पिता सौ. रेखा आणि श्री. संभाजीराव तुकाराम माने यांनी धैर्य दिले. एम्. फिल्.ची प्रबंधिका पूर्ण करण्यासाठी आवश्यकती महत्वाची सर्व संदर्भ पुस्तके मिळवून देण्याचे काम कराड नगरपालिका ग्रंथालयातील श्री. अैय्याज् आत्तार व सौ. सुनंदा शिवदास या दोन्ही ग्रंथपालांचा व त्यांच्या सहकारी मित्रांची मी ऋणी आहे. एम्. फिल्. प्रबंधिका टंकलेखन करण्याचे काम श्री. फुलंब्रीकर व श्री. विठ्ठल पाकले यांनी केले, त्यांची मी ऋणी आहे. या सर्वांनी केलेल्या मोलाच्या सहकार्याला मी कधीही विसरु शकत नाही.

**कु. माधुरी संभाजीराव माने**

## प्रास्ताविक आणि पूर्वाभ्यासाचे स्वरुप

वा. ल. कुलकर्णी यांच्या साहित्य समीक्षेचे विशेष. या प्रबंधिकेतील सर्व प्रकरणामध्ये समीक्षा या विषयाला केंद्रीत ठेवून प्रकरणांचे लेखन केलेले आहे. सर्व प्रकरणे समीक्षेसी संबंधित आहेत. समीक्षा हा प्रमुख विषय आहे.

वाड;मयीन क्षेत्रात वा. लं.चे एक समीक्षक म्हणून स्थान कोणते ? हे जाणून घेण्यासाठी समीक्षेच्या प्रवाहाचा उगम कोठे झाला. आणि तो प्रवाह कसकसा वाहत राहून वळणे बदलत राहिला. काल प्रवाहात अनेक खळबळजनक परिस्थितीत समीक्षक ढवळून कसे निघाले. त्यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले. समीक्षेची गुण वैशिष्ट्ये, निर्माण झालेली वादळे त्या वादळात पूर्ण शक्तीनीशी उभे राहिलेले समीक्षक व या सर्वां समीक्षकामध्ये वा. लं.चे स्थान हे प्रकरण एक समीक्षेची पूर्वपिठीका यामध्ये घेतलेले आहे.

वा. ल. कुलकर्णी यांचे समीक्षा लेखन हे प्रकरण दुसरे या प्रकरणामध्ये वा. लं.नी केलेल्या सर्व वाड;मयीन प्रकारावरील समीक्षा लेखनाचा थोडक्यात मुदूदेसुद उल्लेख केलेला आहे. या लेखनातून त्यांचा समीक्षेविषयीचा दृष्टिकोन लक्षात येतो. वाड;मयीन क्षेत्रातील ज्ञानाची पातळी लक्षात येते. समीक्षालेखनाचे विस्तारीत रुप लक्षात येते.

वा. लं.नी स्वत: समीक्षा लेखन केले, पण त्याचबरोबर समीक्षालेखन करताना समीक्षेचे स्वरुप कसे आहे आणि ते निर्दोष कसे असले पाहिजे हे आपल्या भूमिकेतून मांडून वाड;मयाची प्रकृती वाड;मयाचे प्रयोजन व वाड;मयाची भाषा याविषयी आपली भूमिका मांडली.

प्रकरण चौथे वा. ल. कुलकर्णी यांची समीक्षेविषयीची भूमिका. या प्रकरणामध्ये ललित कृतीच्या स्वरुपाचा आणि समीक्षेचा परस्पर संबंध उलघडण्याचा प्रयत्न केला आहे. समीक्षेची गहनता व स्वरुप आपल्या भूमिकेतून निरनिराळी उदाहरणे देवून अधिक चांगल्यारितीने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रकरण पाचवे वाड;मयीन टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ ?. वाड;मयीन समीक्षेचा अभ्यास करताना वा. लं.ना पडलेला प्रश्न व याचे समर्थन करण्यासाठी त्यांनी मांडलेले मुदूदे आणि घेतलेला उत्तराचा शोध. या प्रकरणामध्ये अभ्यासायला मिळाला. या सर्व समीक्षेविषयाला केंद्रिरुप ठेवून केलेल्या समीक्षेचे विशेष लक्षात येतात. समीक्षा लेखनातून घेतलेल्या उदाहरणातून, अनुभवातून आणि अनेक गोष्टीतून जाणवलेले विशेष प्रकरण सहामध्ये एकत्रितपणे मांडलेले आहेत. ही सर्व प्रकरणे तयार करण्यासाठी वा. लं.च्या सर्व समीक्षाविषयक पुस्तकांचा संदर्भ ध्यावा लागला. वा. लं.च्या पूर्व अभ्यासाचे स्वरुप लक्षात घेताना अनेक साहित्यीकांनी वा. लं.च्या समीक्षेबदूदल मते मांडली आहेत. प्रा. नरहर कुरुंदकर वा. लं.च्या समीक्षेबदूदल म्हणतात की, अप्रतिहत रसिकता व मार्मिकता हे वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेचे विशेष आहे. ज्ञानेश्वर नाडकर्णी म्हणतात की, मला असा आरोप करायचा आहे की,

नवसाहित्याचा शोध घेणारे चोखंदळ समीक्षक आपल्या रंगभूमिकडे पाठ फिरवून राहिलेले आहेत. प्रा. कुलकर्णी व नंतर त्यांच्या पिढीतील साहित्य समीक्षक नाट्य समालोचन करण्याच्या भानगडीत पडले नाहीत. अशा मतांचा आढावा घेवून पूर्व अभ्यासाचे स्वरुप मांडत येईल.

वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेविषयीची प्रकरणे प्रबंधिकेमध्ये अतिशय विचारपूर्वक, सुयोग्यपणे मांडण्याचा विचार केलेला आहे.

परिशिष्ठामध्ये वा. लं.चे समग्र साहित्य आणि त्यांना मिळालेले मान सन्मान समीक्षालेखन करण्यासाठी उपयोगात आणलेली माध्यमे. समीक्षालेखनातून जाणवलेली व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये. वाड;मयीन क्षेत्रात एक समीक्षक म्हणून वा.लं.चे स्थान. वा. लं.चे टीकात्मक लेख. समीक्षालेखानासाठी घेतलेली उदाहरणे यासर्वांचा उल्लेख केलेला आहे. प्रबंधिकेच्या शेवटी संदर्भ ग्रंथ सूची दिलेली आहे.

वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेचे अवलोकन करताना इतरांच्या शब्दातील वा. ल. समजून घेताना वा. ल. कुलकर्णी यांच्या विश्लेषक लेखनाने मन प्रभावित झाले. एखाद्या समस्येवर विचार करतना किती खोलवर जाता येते. याचा उत्तम अनुभव त्यांची समीक्षा वाचताना येते. अनाग्रही वृत्तीने समस्येची उकल कशी करावी याचा प्रत्यय येतो. त्यामुळे आपली प्रज्ञा प्रगल्भ होण्यासाठी आणि सर्वांगिण विचार कसा करावा याची प्रचिती येते. हे माझ्या दृष्टिने फार मोलाचे आहे असे मला वाटते. माझ्या विचार शक्तीला व शोधक दृष्टिला चालना मिळाली. याचे मला अतिशय समाधान वाटले. वा. लं.च्या साहित्य समीक्षेची अभ्यासक म्हणवून घेण्यासाठी आपण पात्र आहोत याचा मला आनंद वाटतो.